**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited "A" Grade

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद-४३१ ००४ महाराष्ट्र ,भारत**
**नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त**

**Ph.D. Section**
**विद्यावाचस्पती विभाग**

Office :- (0240) 2403122 | WEB SITE : www.bamu.ac.in | : http://bamua.digitaluniversity.ac. | E-mail : phdsection@bamu.ac.in

**संशोधन केंद्र व त्यास संलग्न मार्गदर्शक आणि विद्यार्थी यांची माहिती बाबतचे परिपत्रक.**

# परिपत्रक

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादशी संलग्नित महाविद्यालयातील सर्व संशोधन केंद्र, त्यास संलग्नीत मार्गदर्शक आणि त्यांचे विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, संशोधन केंद्राची सूची, संशोधन मार्गदर्शक व आपल्याकडे नोंदणी केलेल्या संशोधक विद्यार्थ्यांची माहिती परिपत्रक अ क्र. पीएच.डी./२०१९-२०/८७२० व क्र. पीएच.डी./२०१९-२०/८७२१ दिनांक ०५/१०/२०१९ व्दारे संबंधितांकडून मागवण्यात आली होती. या प्राप्त माहितीच्या अनुषंगाने सदरील माहिती ही www.bamu.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावरPh.D. Admission या लिंकवर Research Centres या शिर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

संबंधीत महाविद्यालयाने / संशोधन केंद्राने सादर केलेली सविस्तर माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशीत / दर्शविण्यात आलेली आहे, ज्यामध्ये **विद्याशाखा,संशोधन केंद्र त्यामधील विषय, मार्गदर्शकाचे नांव, त्यांचे पदनाम, त्यांच्याकडे नोंदणी केलेले संशोधक विद्यार्थी त्यांचा प्रवर्ग, नोंदणीचा दिनांक** इत्यादी स्वरूपाची माहिती दर्शविण्यात आलेली आहे. सदरील यादीमधील माहिती ही अंतीम करावयाची आहे. सर्व माहितीचे सर्व संबंधीतांनी अवलोकन करून, सदरील प्रकाशित यादी मध्ये काही त्रुटी असल्यास किंवा काही विद्यापीठ मान्यता प्राप्त संशोधन केंद्राची नावे मार्गदर्शकांची नांव व त्यांचे संशोधक विद्यार्थी यांचा अंतर्भुत नसल्यास त्या संबंधीची माहिती मान्यता पत्रासह व इतर सहपत्रासह **परिपत्रक जाहीर झाल्यापासून सात दिवसाचे आत विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे.**

सदरील माहितीच्या अनुषंगाने सात दिवसामध्ये माहिती **अप्राप्त** झाल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे समजून सदरील माहिती अंतिम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सबब, आपणांस सूचीत करण्यात येते की, सदरील माहिती ही अंतिम करून आपण दर्शविल्या प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, त्याकरिता आपल्याशी संबंधीत माहितीचे अवलोकन करून माहितीची पुर्तता (सात दिवसामध्ये) दि. १०/०१/२०२० रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत हार्ड कॉपीसह पीएच.डी. विभागामध्ये जमा करण्यात यावी, सोबत संशोधन केंद्राच्या मान्यतेचे पत्र / संलग्निकरणाचे भरलेले शुल्क, विद्यार्थ्यांचे संशोधन मान्यता पत्र इत्यादी सादर करण्यात यावे. त्यानंतर कोणत्याही सबबीवर आपले म्हणणे ऐकुण घेतले जाणार नाही. कृपया याची गांभिर्याने नोंद घ्यावी, हि विनंती.

विद्यापीठ परिसर; ][
औरंगाबाद - 431 004 ][
संदर्भ. क्र. पीएच.डी./2019-20/13069-73 ][
दिनांक : ०४/०१/२०२० ][

04/1/2020

उपकुलसचिव
पीएच.डी. विभाग